# नया नगरमधील रस्त्यांना मोकळा श्वास

## मेट्रोसाठी उभारलेले रस्ता रोधक हटविले

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** 'कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो ३' मार्गिकेच्या भुयारीकरणाच्या कामासाठी माहीम - धारावी परिसरातील नया नगर येथील रस्ता रोधक उभारण्यात आले होते. टीबीएम यंत्र भूगर्भात सोडण्यासाठी येथे मोठी विहीर खोदण्यात आली होती. या विहिरीलगत हे रस्ता रोधक उभारण्यात आले होते. मुंबई मेट्रो वन प्रायव्हेट लिमिटेडने



(एमएमआरसीएल) दोन दिवसांपूर्वी येथील रस्ता रोधक हटविले असून अखेर पाच वर्षांनंतर नया नगरमधील रस्त्याने मोकळा श्वास घेतला आहे.

'मेट्रो ३'च्या कामासाठी ३३.५ किमीच्या मार्गादरम्यान अनेक ठिकाणी रस्ता रोधक उभारून रस्ते बंद केले आहेत. २०१७ पासून रस्ते बंद असून यामुळे वाहतूक कोंडीची समस्या भेडसावत आहे. भुयारीकरणाचे काम आता पूर्ण झाले आहे. दरम्यान, जसजसे काम पूर्ण होईल तसतसे रस्ता रोधक हटवून रस्ते मोकळे करण्याच्या कामाला २०२३ मध्ये सुरुवात होईल, असे एमएमआरसीने जाहीर केले होते. त्यानुसार अखेर रस्ता रोधक हटविण्यास सुरुवात झाली आहे.

धारावी-माहीम येथील नया नगर येथे टीबीएम यंत्र भूगर्भात सोडण्यासाठी पहिली विहीर खोदण्यात आली होती. येथूनच २०१७ मध्ये पहिले टीबीएम यंत्र भूगर्भात सोडण्यात आले होते. आता भुयारीकरण करून सर्व टीबीएम यंत्र बाहेर आले आहेत. त्यामुळे आता टप्प्याटप्प्यात रस्ता रोधक हटवून रस्ते मोकळे केले जात असल्याची माहिती एमएमआरसीतील वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली. नया नगरमधील रस्ता रोधक हतविण्यात आले असून येथील रस्ता मोकळा करून तो वाहतुकीसाठी खुला करण्यात आला आहे. रस्ता खुला झाल्याने माहीम-माटुंगा, धारावी-बीकेसीला जाणाऱ्यांना दिलासा मिळाला आहे.